# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ३४८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:- २२/०६/२०१६.

१) मोटार सायकलची चोरी. :-

दिनांक २०/०६/०१६ रोजी १७.०० ते १८.०० वा. दरम्यान फिर्यादी विद्यानंद प्रभु कांबळे वय ३९ वर्ष, रा. मानेगाव हे त्यांची स्पलेंडर प्लस हीरो होंडा मोटार सायकल क्र. एमएच ३१ डीआर ६८७० कि. १०,०००/-रू. ची घेवुन बारव्हा बाजारात बाजार करण्यासाठी गेले होते. बाजार करून आल्यानंतर त्यांना त्यांची मोटार सायकल ठेवलेल्या ठिकाणी दिसली नाही. कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी पाहुन मोटार सायकल चोरून नेली. असे फिर्यादिचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३७९ भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. कठाणे पो. स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

२) शुल्लक कारणावरून मारून जखमी केले. :-

दिनांक २१/०६/२०१६ रोजी १६.०० वा. दरम्यान फिर्यादि शुभम अनील सार्वे वय १९ वर्ष, रा. सावरी याने वेचलेल्या जांभळी आरोपीने येवुन एकाएकी फेकल्या यावरून फिर्यादि आरोपीला बोलला म्हणुन आरोपीने फिर्यादि सोबत भांडण व लांबाझोंबी करून दगडाने डोक्यावर मारून फिर्यादिला जखमी केले. असे फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३२४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास सफौ. कांबळे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

३) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :-

दिनांक २१/०६/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा--यांवर ०१ केसस, तिन सिटर वाहनांवरती १२ केसेस व इतर वाहनांवरती १०९ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.